## MAHARASHTRA ACT No. XLV OF 1969.

## THE MAHARASHTRA FRUIT NURSERIES (REGULATION) ACT 1969.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ९ सप्टेंबर १९६९ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

## MAHARASHTRA ACT No. XLV OF 1969.

## AN ACT TO PROVIDE FOR THE LICENSING AND REGULATION OF FRUIT NURSERIES IN THE STATE OF MAHARASHTRA.

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १२ सप्टेंबर १९६९ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

## सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५

### महाराष्ट्र राज्यामध्ये फळांच्या रोपमळ्यांना अनुज्ञप्ति देण्याची व त्यांचे विनियमन करण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यात, फळांच्या रोपमळ्यांना अनुज्ञप्ति देणे व त्यांचे नियमन करणे तसेच तत्संबंधित बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या विसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव, व्याप्ति व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) अधिनियम, १९६९ असे म्हणता येईल.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्याला लागू असेल.

(३) राज्यशासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशा तारखेस तो अंमलात येईल.

**व्याख्या.**

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "सक्षम प्राधिकरण" म्हणजे कलम ३ अन्वये नेमण्यात आलेले सक्षम प्राधिकरण ;

(ब) "फळांचा रोपमळा" म्हणजे, ज्या ठिकाणी नित्याचा व्यवसाय म्हणून फळांच्या रोपांची पैदास करण्यात येते आणि प्रतिरोपणासाठी त्यांची विक्री करण्यात येते असे कोणतेही ठिकाण, परंतु त्यात शासनाच्या मालकीच्या किंवा शासनाकडून व्यवस्था ठेवण्यात येणाऱ्या फळांच्या रोपमळ्यांचा समावेश होणार नाही ;

(क) "फळाचे रोप" म्हणजे, खाद्य फळे किंवा कवचधारी फळे देणारे कोणतेही रोप, आणि त्यात डोळे असलेली फांदी ( Budwood ), बीजरोप ( Seedlings ), कलमे (Grafts), दाब कलमे (Layers), बी ( Seeds), कंद (Bulb), शोषक (Sucker), कुडे ( Rhizomes ) आणि अशा कोणत्याही रोपांची छाट कलमे (Cuttings) यांचा समावेश असेल;

(ड) फळांच्या रोपमळ्यांच्या संबंधात, "मालक" म्हणजे, अशा फळांच्या रोपमळ्यांच्या कारभारावर जिचे अंतिम नियंत्रण असेल अशी व्यक्ती किंवा असे प्राधिकरण आणि उक्त कारभार व्यवस्थापक, व्यवस्थापन संचालक किंवा व्यवस्थापन अभिकर्ता यांजकडे सोपविण्यात आला असेल त्याबाबतीत असा व्यवस्थापक, व्यवस्थापन संचालक किंवा व्यवस्थापन अभिकर्ता हा फळांच्या रोपमळ्यांचा मालक असल्याचे मानण्यात येईल ;

(इ) "विहित" म्हणजे, या अधिनियमाखालील नियमांद्वारे विहित केलेला ;

(फ) "मूलकांड" ( Root Stock ) म्हणजे, ज्याच्यावर फळाच्या रोपाच्या कोणत्याही भागाचे कलम केले असेल (Grafted) किंवा ज्याचा डोळा भरण्यात आला असेल असे फळाचे रोप किंवा त्याचा भाग ;

(ग) "कलम" ( Scion ) म्हणजे, मूलकांडावर ज्याचे कलम करण्यात आले असेल किंवा ज्याने मूलकांडाचा डोळा भरण्यात आला असेल असा फळाच्या रोपाचा भाग.

**सक्षम प्राधिकाऱ्यांची नियुक्ती.**

३. राज्य शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे,—

(अ) त्यास योग्य वाटतील अशा शासनाचे राजपत्रित अधिकारी असणाऱ्या व्यक्तींची, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल ; आणि

(ब) ज्या क्षेत्रमर्यादेत या अधिनियमान्वये किंवा त्याखाली सक्षम प्राधिकाऱ्यास प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा त वापर करू शकतील आणि सोपविलेली कर्तव्ये पार पाडू शकतील ती क्षेत्रमर्यादा निर्धारित करता येईल.

**प्रत्येक फळांच्या रोपमळ्याच्या मालकाने अनुज्ञप्ती घेणे.**

४. फळांच्या रोपमळ्याचा कोणताही मालक या अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख किंवा तो ज्या तारखेस अशा रोपमळ्याचा मालक होईल ती तारीख यापैकी जी नंतरची असेल अशा तारखेपासून सहा महिने संपल्यानंतर, या अधिनियमाच्या आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या उपबंधाअन्वये त्याने घेतलेल्या अनुज्ञप्तिअन्वये आणि तीस अनुसरून असेल त्याखेरीज, फळाच्या रोपमळ्याचा धंदा चालविणार नाही किंवा करणार नाही.

**स्पष्टीकरण:**—एखाद्या मालकाचे फळांचे एकापेक्षा अधिक रोपमळे असतील—मग ते त्याच नगरात किंवा गावात असोत अगर निरनिराळ्या नगरांमध्ये किंवा गावांमध्ये असोत—तेव्हा तो फळांच्या अशा प्रत्येक रोपमळ्यासाठी वेगवेगळी अनुज्ञप्ती घेईल.

**अनुज्ञप्तीच्या मंजुरीसाठी व तिचे नवीकरण करण्याकरिता अर्ज.**

५. (१) निकटपूर्वीच्या कलमामध्ये निर्दिष्ट केलेली अनुज्ञप्ति घेण्याची इच्छा असणारा कोणताही मालक, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने सक्षम प्राधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करील आणि त्यासोबत जी पन्नास रुपयांपेक्षा अधिक नसेल अशी विहित करण्यात येईल ती फी देईल.

(२) असा अर्ज मिळाल्यावर, सक्षम प्राधिकारी, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करील. जर,—

(अ) ज्या फळांच्या रोपमळ्याच्यासंबंधात अनुज्ञप्तीसाठी अर्ज करण्यात आला असेल, तो रोपमळा, फळांच्या रोपांच्या उचित पैदाशीसाठी योग्य आहे ;

(ब) अर्जदार, असा फळांचा रोपमळा चालविण्यास सक्षम आहे ;

(क) अर्जदाराने, विहित करण्यात आलेली अनुज्ञप्ती फी दिली आहे ;

(ड) पैदास करण्यात येणाऱ्या रोपांचा दर्जा आणि त्यांची वाजवी दराने विक्री सुनिश्चित करणाऱ्या, विहित करण्यात येतील अशा शर्ती अर्जदार पुऱ्या करीत आहे किंवा त्या पुऱ्या करण्याची हमी देत आहे ;

याबद्दल सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री होईल तर तो अर्जदारास अनुज्ञप्ती मंजूर करील. सक्षम प्राधिकाऱ्याची तशी खात्री न झाल्यास, त्यास, आपली बाजू मांडण्याची वाजवी संधि अर्जदारास दिल्यानंतर, आणि (अनुज्ञप्ती) नाकारण्याच्या कारणाचे संक्षिप्त निवेदन नमूद केल्यानंतर, अनुज्ञप्ती मंजूर करण्यास नकार देता येईल, आणि अशा निवेदनाची एक प्रत अर्जदारास देता येईल आणि त्याने दिली असेल अशी अनुज्ञप्ति फी त्यास परत करता येईल.

(३) या कलमान्वये मंजूर करण्यात आलेली प्रत्येक अनुज्ञप्ती तीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीपर्यंत वैध असेल; आणि सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करण्यात आल्यावर विहित करण्यात येईल अशा मुदतीकरिता आणि विहित करण्यात येईल अशी फी दिल्यानंतर आणि अशा शर्तींवर, वेळोवेळी, तिचे नवीकरण करण्यात येईल. अनुज्ञप्तीच्या नवीकरणास सक्षम प्राधिकारी नकार देईल त्याबाबतीत तो अशा नकाराबाबतच्या कारणांचे संक्षिप्त निवेदन नमूद करील आणि त्याची एक प्रत, अर्जदारास देईल :

परंतु, अर्जदारास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधि दिल्याशिवाय अनुज्ञप्तीच्या नवीकरणास नकार देणारा कोणताही आदेश काढता कामा नये.

६. या अधिनियमाखालील प्रत्येक अनुज्ञप्तीधारक :— अनुज्ञप्ती धारकाची कर्तव्ये.

(अ) सक्षम प्राधिकाऱ्याकडून निर्देशित करण्यात येईल त्याप्रमाणे कलम (Scion) किंवा मूलकांड (Root stock) यांच्या संबंधात पैदाशीकरिता किंवा विक्रीकरिता अनुज्ञप्तीत निर्दिष्ट केलेल्या फळाच्या रोपाच्या प्रकारांचाच केवळ वापर करण्यात येईल अशी हमी देईल ;

(ब) प्रत्येक मूलकांड व प्रत्येक कलम (Scion) यांचा उगम किंवा उत्पत्ति याबद्दलची संपूर्ण माहिती ठेवील व तीत पुढील गोष्टी दर्शविण्यात येतील :—

(एक) वापरण्यात आलेल्या मूलकांडाचे कोणतेही स्थानिक नाव असेल तर त्यासह त्याचे वनस्पतिशास्त्रातील नाव ;

(दोन) फळाची रोपे वाढविताना, वापरलेल्या कलमाचे (Scion) कोणतेही स्थानिक नाव असेल तर, त्यासह, त्याचे वनस्पतिशास्त्रातील नाव ;

(क) फळाची रोपे वाढविताना वापरण्यात आलेल्या प्रत्येक मूलकांडाच्या आणि कलमाच्या (Scion) झाडाची जागा दर्शविणारा आराखडा ठेवील ;

(ड) रोपांचे वाफे, तसेच फळांच्या रोपांच्या पैदाशीसाठी वापरण्यात आलेली जनक झाडे विनाशी कीटक व वनस्पति रोग यापासून मुक्त ठेवील ;

(ई) सक्षम प्राधिकाऱ्याकडून निदेश देण्यात येईल अशा रीतीने फळाची रोपे तयार करण्याची हमी देईल;

(फ) विक्रीचा उद्देश असलेल्या कोणत्याही पुडक्यात, बंद केलेल्या फळांच्या रोपाच्या प्रत्येक प्रकाराचे नाव, विहित रीतीने ठरविण्यात आलेले त्याचे वय आणि अशा प्रत्येक फळाच्या रोपाच्या कलमाच्या (Scion) नावासह, मूलकांडाचे नाव, ठळक रीतीने खूणचिठ्ठीवर विनिर्दिष्ट करील;

(ग) कोणत्याही प्रकारचे विनाशी कीटक किंवा वनस्पती रोग यापासून संपूर्णपणे मुक्त असतील अशीच फळांची रोपे विक्रीसाठी व वाटपासाठी देण्यात येतील याची हमी देईल.

(ह) कोणत्याही व्यक्तीला विकलेल्या फळाच्या रोपाचे नाव, त्याचे (रोपाचे) वय, मूलकांड आणि कलम याचे नाव आणि ते खरेदी करणाऱ्या व्यक्तीचे नाव व पत्ता दर्शविणारी एक नोंदवही, सक्षम प्राधिकाऱ्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नमुन्यात ठेवील.

७. राज्याच्या कोणत्याही भागात पैदास करण्यात येणाऱ्या फळांच्या रोपांचा दर्जा टिकविण्याच्या किंवा त्यांचे हानिकारक विनाशी कीटकांपासून किंवा वनस्पति रोगापासून संरक्षण करण्याच्या प्रयोजनाकरिता, राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, राज्य शासन, खालील अशा निर्बंधास आणि शर्तीस अधीन राहून अज्ञात अभिजातीच्या कोणत्याही फळांचे रोप, किंवा कोणत्याही संक्रामक किंवा सांसर्गिक कीट किंवा रोग याची बाधा झालेल्या फळाचे रोप, केंद्र सरकारने निर्धारित केल्याप्रमाणे सीमाशुल्क सरहद्दीवरील ने-आण वगळता राज्यात किंवा त्याच्या कोणत्याही भागात आणणे किंवा त्यामधून ते बाहेर नेणे किंवा राज्यांतर्गत त्यांचे परिवहन करणे यांचे नियमन करता येईल किंवा त्यास मनाई करता येईल.

विवक्षित फळांच्या रोपांची आयात, निर्यात किंवा परिवहन यांचे नियमन करण्याची किंवा मनाई करण्याची राज्य सरकारची शक्ति.

अनुज्ञप्ती रद्द करण्याची किंवा निलंबित करण्याची शक्ति.

८. (१) सक्षम प्राधिकारी, या अधिनियमान्वये देण्यात आलेली किंवा नवीकरण करण्यात आलेली कोणतीही अनुज्ञप्ती पुढीलपैकी कोणत्याही एका किंवा अधिक कारणामुळे निलंबित करील किंवा रद्द करील :—

(अ) त्याने फळाच्या रोपमळ्यावरील त्याचे नियंत्रण पूर्णत: किंवा अंशत: सोडून दिले असेल किंवा असा फळाचा रोपमळा चालविणे किंवा तो धारण करणे त्याने अन्यथा बंद केले असेल;

(ब) राज्य शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कोणत्याही फळाच्या रोपाच्या कोणत्याही प्रकाराचा कमाल दर किंवा किंमत निश्चित केलेली असेल त्याबाबतीत त्याने फळाचे असे कोणतेही रोप अधिक दराने किंवा किंमतीस विकले असेल;

(क) त्याने अनुज्ञप्तीच्या अटी व शर्तींपैकी कोणत्याही अटींचे व शर्तींचे किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने कायदेशीररीत्या दिलेल्या कोणत्याही निदेशांचे अनुपालन करण्यात, योग्य कारणांशिवाय कसूर केली असेल किंवा त्याने हा अधिनियम किंवा त्याअन्वये केलेले नियम यांच्या कोणत्याही उपबंधांचे उल्लंघन केलेले असेल ;

(ड) कोणत्याही इतर विहित कारणावरून.

(२) सक्षम प्राधिकारी, अनुज्ञप्तीच्या संबंधात पोट-कलम (१) अन्वये रद्द करण्याचा आदेश होईपर्यंत अनुज्ञप्ती निलंबित करू शकेल.

(३) पोट-कलम (१) अन्वये आदेश देण्यापूर्वी, सक्षम प्राधिकारी, ज्या कारणांमुळे कारवाई करण्याचे ठरविले असेल ती कारणे अनुज्ञप्तीधारकाला कळविल आणि अशा कारवाईविरुध्द कारण दाखविण्याची वाजवी संधी त्याला देईल.

(४) पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये देण्यात आलेल्या प्रत्येक आदेशाची एक प्रत अनुज्ञप्तीधारकाला तावडतोब पाठविण्यात येईल.

अनुज्ञप्ती परत करणे.

९. अनुज्ञप्तीत विनिर्दिष्ट केलेला विधिग्राह्यतेचा कालावधी संपल्यानंतर किंवा अनुज्ञप्ती निलंबित केल्याचा किंवा रद्द केल्याचा आदेश मिळाल्यानंतर, अनुज्ञप्तीधारकाने ती अनुज्ञप्ती सक्षम प्राधिकाऱ्याकडे परत दिली पाहिजे :

परंतु, (अनुज्ञप्ति) अशा प्रकारे समाप्त करण्यात, निलंबित करण्यात किंवा रद्द करण्यात आल्यानंतर, असा सक्षम प्राधिकारी, मालकाला आपल्या फळाच्या रोपमळ्याचे समापन करणे शक्य व्हावे यासाठी त्याला योग्य वाटेल इतका वेळ, त्यास देईल.

अनुज्ञप्तीची दुसरी प्रत.

१०. मालकाला दिलेली अनुज्ञप्ति हरवली असेल, नष्ट झाली असेल, जीर्णशीर्ण किंवा खराब झाली असेल तर, सक्षम प्राधिकारी, अर्ज केल्यावर आणि विहित केलेली फी दिल्यावर अनुज्ञप्तीची दुसरी प्रत देईल.

अपीले.

११. (१) अनुज्ञप्ती देण्यास किंवा तिचे नवीकरण करण्यास नकार देणाऱ्या किंवा ती निलंबित किंवा रद्द करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशामुळे, आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि रीतीने, अशा कालावधीत आणि अशा प्राधिकाऱ्याकडे अपील करता येईल :

परंतु, अपीलदारास वेळेवर अपील दाखल करण्यास पुरेशा कारणामुळे प्रतिबंध झाला होता अशी अपील प्राधिकाऱ्याची खात्री झाली असेल तर, अपील प्राधिकाऱ्यास विहित कालावधी संपल्यानंतर अपील स्वीकारता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये अपील मिळाल्यानंतर, अपील प्राधिकारी, अपीलदारास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, अपीलावर, त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे आदेश देईल.

२६६



(३) या कलमान्वये देण्यात आलेला आदेश, पुढील अनुवर्ती कलमाच्या उपबंधांना अधीन राहून, अंतिम असेल.

१२. (१) राज्य शासनास, स्वाधिकारे किंवा आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या व्यक्तीने त्याच्याकडे केलेल्या अर्जावरून कोणत्याही वेळी, या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाची वैधता किंवा औचित्य याबद्दल त्याची स्वतःची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनाकरिता, कोणत्याही प्रकरणाचे अभिलेख मागविता येईल आणि तपासणी करता येईल आणि त्याला योग्य वाटेल असा आदेश त्यावर देता येईल : पुनरीक्षण.

परंतु, ज्या आदेशाविरुद्ध निकट पूर्वीच्या कलमान्वये दाखल करण्यात आलेले अपील प्रलंबित असेल त्या आदेशाच्या संबंधात, किंवा अपिलासाठी असलेली कालमर्यादा संपण्यापूर्वी जे दाखल करण्यात आले नसेल अशा बाबतीत, राज्यशासन, या कलमाअन्वये त्यास प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करणार नाही :

तसेच, राज्य शासन या कलमाखालील ज्या कोणत्याही आदेशामुळे ज्या कोणत्याही व्यक्तीवर प्रतिकूल परिणाम होत असेल त्या व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज, असा आदेश देणार नाही.

(२) या कलमान्वये देण्यात आलेला आदेश अंतिम असेल.

१३. (१) कोणत्याही फळाच्या रोपमळयाच्या स्थितीबद्दल खात्री करून घेण्याच्या प्रयोजनार्थ किंवा त्याच्या कामाची तपासणी करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा या अधिनियमात किंवा त्याअन्वये करण्यात आलेल्या नियमात उल्लेखिलेल्या इतर कोणत्याही प्रयोजनार्थ सक्षम प्राधिकाऱ्यास, किंवा त्याने किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेली कोणत्याही व्यक्तीस, सर्व वाजवी वेळांमध्ये आणि सहाय्यकासह किंवा सहाय्यकाशिवाय,— प्रवेश करण्याची व निरीक्षण करण्याची शक्ती.

(अ) फळांच्या कोणत्याही रोपमळयात प्रवेश करण्याचा आणि त्यामधील फळांच्या रोपांचे निरीक्षण किंवा तपासणी करण्याचा ;

(ब) अशा रोपमळयासंबंधीची कोणतीही हिशेबाची पुस्तके, नोंदणी पुस्तके, अभिलेख किंवा इतर लेख सादर करण्याबद्दल आदेश देण्याचा आणि त्यामधून उतारे किंवा लेखाच्या प्रती घेण्याचा किंवा घेवविण्याचा ;

(क) आवश्यक ते सर्व प्रश्न विचारण्याचा आणि अशा रोपमळयावर नियंत्रण असणाऱ्या किंवा त्यासंबंधात कामावर ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीची तपासणी करण्याचा अधिकार असेल.

(२) अनुज्ञप्तीधारक आणि रोपमळयाच्या संबंधात कामावर ठेवलेल्या सर्व व्यक्ती, सक्षम प्राधिकारी किंवा प्राधिकृत व्यक्ती यांस, उपरोक्त प्रयोजनार्थ आवश्यक असेल त्याप्रमाणे, अशा निरीक्षणासाठी व तपासणीसाठी वाजवी प्रवेश करू देतील व सर्व वाजवी सोयी उपलब्ध करून देतील आणि आपल्या माहितीनुसार व विश्वासानुसार सर्व प्रश्नांची उत्तरे देणे, आपल्या कब्जातील लेख सादर करणे आणि अशा प्राधिकाऱ्यास किंवा व्यक्तीस आवश्यक वाटेल अशी, फळांच्या रोपमळयासंबंधीची इतर माहिती देणे त्यावर बंधनकारक असेल.

१४. कोणतीही व्यक्ती,— शास्ति.

(अ) या कलमान्वये शिक्षापात्र ठरविण्यात आलेल्या, या अधिनियमाच्या किंवा त्याअन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाच्या कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करील, किंवा

(ब) या अधिनियमाअन्वये किंवा तदन्वये कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा व्यक्तीस प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा तो वापर करीत असताना किंवा तिच्यावर सोपविण्यात आलेले कोणतेही कर्तव्य बजावीत असताना त्यास अडथळा करील; तर त्या व्यक्तीस, दोषसिद्धीनंतर एक हजार रुपयांच्या मर्यादेपर्यंत दंडाची शिक्षा करण्यात येईल.

कंपन्यांनी केलेले अपराध.

१५. (१) या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल त्याबाबतीत, अपराध घडल्याच्या वेळी, कंपनीचा धंदा चालविण्यासाठी कंपनी ज्या व्यक्तीच्या स्वाधीन होती आणि जी व्यक्ती तिला जबाबदार होती ती प्रत्येक व्यक्ती त्याचप्रमाणे कंपनी, ही, अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि ती त्याप्रमाणे त्यांच्याविरुद्ध खटला केला जाण्यास व शिक्षा केली जाण्यास पात्र ठरतील :

परंतु, अशी कोणतीही व्यक्ती, असा अपराध तिच्या नकळत झाला आहे किंवा असा अपराध होऊ नये म्हणून तिने सर्व वाजवी दक्षता घेतली होती असे सिद्ध करील तर ती, या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे या अधिनियमात उपबंधित केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या कंपनीने या अधिनियमाखालील एखादा अपराध केलेला असेल व तो अपराध कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा इतर अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा त्याने कानाडोळा केल्यामुळे किंवा त्याच्याकडून झालेल्या कोणत्याही हयगयीमुळे घडलेला आहे, असे शाबीत होईल त्या बाबतीत, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी हा सुद्धा त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे मानले जाईल आणि त्यानुसार त्याच्याविरूद्ध खटला केला जाण्यास व शिक्षा केली जाण्यास पात्र होईल.

स्पष्टीकरण :—या कलमाच्या प्रयोजनार्थ :—

(अ) "कंपनी" म्हणजे, कोणताही निगम निकाय, आणि त्यात एखाद्या भागीदारी संस्थेचा किंवा व्यक्तींच्या इतर संघाचा समावेश होतो ;

(ब) एखाद्या भागीदारी संस्थेच्या संबंधात, "संचालक" म्हणजे भागीदारी संस्थेतील एखादा भागीदार.

अपराधाची दखल घेणे.

१६. सक्षम प्राधिकाऱ्याने किंवा या बाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला अपराध ज्या तथ्यांचा मिळून बनला असेल त्या तथ्यांविषयी लेखी प्रतिवेदन केले असेल त्याव्यतिरिक्त, कोणतेही न्यायालय अशा अपराधाची दखल घेणार नाही.

न्यायालयाची अधिकारिता.

१७. इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्गाचा दंडाधिकारी यांच्यापेक्षा कनिष्ठ असलेले कोणतेही न्यायालय, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करणार नाही.

या अधिनियमान्वये शक्तींचा वापर करणारे अधिकारी व व्यक्ती हे लोकसेवक असतील.

१८. या अधिनियमान्वये नियुक्त केलेले सर्व अधिकारी आणि या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये त्यास प्रदान केलेल्या कोणत्याही शक्तींचा वापर करण्यासाठी व त्याच्यावर सोपवलेली कोणतीही कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्राधिकृत केलेली प्रत्येक व्यक्ती ही, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थकक्षेनुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

सद्भावनापूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

१९. हा अधिनियम किंवा तदन्वये केलेले कोणतेही नियम यानुसार सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल राज्य शासन किंवा कोणताही अधिकारी किंवा व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणताही दावा, अभियोग किंवा इतर वैध कार्यवाही करता येणार नाही.

२०. राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, असा निदेश देऊ शकेल की, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाद्वारे राज्य शासनास प्रदान केलेल्या कोणत्याही करावयाची शक्ती (नियम करण्याची शक्ति वगळता) किंवा त्याच्यावर सोपवलेले कर्तव्य, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात यईल अशा परिस्थितीत व अशा शर्तीस, कोणत्याही असल्यास, अधीन राहून, राज्य शासनास अधीन असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा प्राधिकरणास वापरता येईल किंवा पार पाडता येईल. प्रत्यायोजन शक्ती.

२१. (१) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे व पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील. नियम.

(२) विशेषत: व पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेला हानी न पोचवता अशा नियमात खालील सर्व बाबींसाठी किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(अ) अनुज्ञप्तीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना व रीत, अशा अनुज्ञप्तीसाठी व तिच्या नवीकरणासाठी द्यावयाची फी, कलम ५ अन्वये ज्या मुदतीसाठी, ज्या शर्तींच्या अधीन, ज्या नमुन्यात अनुज्ञप्ति देता येईल ती मुदत, त्या शर्ती व तो नमुना ;

(ब) अनुज्ञप्तीधारीने ज्यांचे उल्लंघन केल्याने कलम ८ अन्वये अनुज्ञप्ति निलंबित करणे किंवा रद्द करणे भाग पडेल ती इतर कारणे ;

(क) कलम १० अन्वये अनुज्ञप्तीच्या दुसऱ्या प्रतीच्या संबंधात देय असलेली फी;

(ड) कलम ११ अन्वये ज्या नमुन्यात व ज्या रीतीने, ज्या मुदतीत आणि ज्या प्राधिकाऱ्याकडे अपील करता यईल तो नमुना व ती रीत, ती मुदत व तो प्राधिकारी, आणि अपील निकालात काढताना अपील प्राधिकाऱ्याने अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(इ) विहित करावयाची असेल किंवा विहित करता येईल अशी कोणतीही इतर बाब.

(३) या कलमान्वये केलेल्या कोणत्याही नियमात, त्याचे उल्लंघन कलम १४ अन्वये शिक्षापात्र ठरेल अशी तरतूद करता येईल.

(४) ह्या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून यथास्थिति, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच तो नियम अंमलात येईल किंवा तो अंमलात येणार नाही, तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

(यथार्थ अनुवाद)

**वा. ना. पंडित,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.